# भंगार बस सेवा : भाडेवाढ कबुल, मात्र सेवेचे काय?

## कधीही, कोठेही बंद पडतात एसटी बस | प्रवाशांसह चालक, वाहकही त्रासले



**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि.25 )** - राज्याची जीवनवाहिनी एसटीच्या भाड्यात उद्यापासून पंधरा टक्के वाढ झाल्याने सर्वसामान्य प्रवाशांना फटका बसणार आहे.

दरवर्षी एसटी महामंडळाकडून भाडेवाढ केली जाते, परंतू प्रवाशांचा भार भंगार बसेस च्या भरवश्यावर ओढल्या जात आहे. या बसेस कधीही, कोठेही नादुरुस्त होवून बंद पडतात. या प्रकाराला आता प्रवाशांसह चालक, वाहकही त्रासले आहे.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती, इंधन आणि सुट्या भागांची दरवाढ आणि संचित तोटा, अशा कारणांमुळे ही भाडेवाढ एका अर्थाने अटळ होती. दैनंदिन खर्च आणि उत्पन्नात ताळमेळ नसून एसटीला दररोज तीन कोटी रुपयांचा तोटा होतो, तसेच गेल्या तीन-चार वर्षांत दरवाढ झालेली नाही. त्यामुळेच दरवाढीच्या प्रस्तावाला परिवहन प्राधिकरणाने अखेर मान्यता दिली. एसटीचे आर्थिक दुखणे जुनेच आहे. कर्मचाऱ्यांचे वाढलेले पगार, डिझेल आणि सीएनजीची दरवाढ, सुट्या भागांची दरवाढ आणि सर्वसाधारण महागाई ही महामंडळाच्या प्रस्तावातील कारणे पटण्याजोगी आहेत; मात्र जगात कोणतीही सार्वजनिक वाहतूक सेवा फायद्यात नाही. नफा कमावणे हा तिचा उद्देशच नाही, त्यामुळेच दररोज 50 लाखांहून अधिक नागरिक प्रवास करीत असलेल्या एसटीच्या तोट्याचा बाऊ करण्याऐवजी सरकारने या सेवेला पाठबळ दिले पाहिजे.

### सवलतीमूळे वाढला भार

महिला आणि वृद्धांना भाड्यात सवलत दिल्याने प्रवासीसंख्याही वाढली आहे; मात्र राज्यात अशा सेवा देणाऱ्या यंत्रणांचे नीट व्यवस्थापन करण्याऐवजी लोकप्रिय, थेट लाभाच्या घोषणांकडेच राज्यकर्त्यांचा कल दिसतो. आता या दरवाढीने महामंडळाला काहीसा दिलासा मिळाला, तरी सेवेत सुधारणा होणार का, हा लाखमोलाचा प्रश्न आहे. लालपरी बसच्या दुरवस्थेने प्रवासी हैराण झाले आहेत. सुट्या भागांची चणचण आणि देखभाल दुरुस्तीअभावी जागोजागी रस्त्यात बंद पडलेल्या बस दिसून येतात. एसटी स्थानकांची अवस्था दारूण आहे. कंत्राटदारांच्या बसमध्ये प्रशिक्षित चालक नसल्याने अपघातांची टांगती तलवार आहे.

### खासगी बसधारकांची चांदी

अनेक गर्दीच्या मार्गांवर पुरेशा बस नसल्याने गैरसोय होते. प्रवासी डोळ्यादेखत ओढून नेणाऱ्या खासगी प्रवासी बसवरील कारवाईत हितसंबंध आड येतात. या अडचणींकडे महामंडळाचे व्यवस्थापन आणि राज्य सरकारने प्राधान्याने लक्ष पुरविणे गरजेचे आहे. 'रेवडी' योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च करणाऱ्या सरकारने अशा यंत्रणांसाठीही तिजोरी उघडली पाहिजे.

# पुणे येथील अपघातात अमरावतीची तरुणी ठार

## पुण्यात डंपर पलटी होवून चिरडल्या दोन विद्यार्थिनी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )**- पुण्याच्या हिंजवडीत भरधाव वेगात निघालेला रेडिमिक्स डंपर वळणावर आला आणि वाहनावरील चालकाचं नियंत्रण सुटलं. यामुळं रेडिमिक्स डंपर पलटी झाला, पण दुर्दैवाने त्याचवेळी रेडिमिक्स डंपरखाली शेजारून जात असलेली दुचाकी दबली गेली, दुचाकीवरील दोन विद्यार्थिनींचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, ज्यामध्ये अमरावती च्या तरुणीचा समावेश आहे. आश्लेषा नरेंद्र गावंडे (वय 22, रा. गोदरेज प्रॉपर्टीज, म्हाळुंगे; मूळ रा. शेगाव, अमरावती) असे मृत्यूमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे. आश्लेषासह प्रांजली महेश यादव (वय ङ्क 22, रा. गोदरेज प्रॉपर्टी., म्हाळुंगे; मूळ रा. टेंभुर्णी, ता. माढा) या विद्यार्थीनीचाही यात



मृत्यू झाला आहे. या दोघी एमआयटी कॉलेजमध्ये अभियांत्रिकेच्या शेवटच्या वर्षात शिकत होत्या. काल (शुक्रवारी) सायंकाळी त्या दुचाकीवरून चालल्या होत्या. वडजाईनगर कॉर्नरजवळ भरधाव आलेल्या डंपरचालकाचे वळणावर नियंत्रण सुटल्यानं डंपर पलटी झाला. प्रांजली आणि आश्लेषा या डंपरखाली सापडल्या गेल्या. तीन क्रेनच्या मदतीने डंपर बाजूला घेण्यात आला.

### मृतदेहाचे तुकडे फावड्याने...

32 टनच्या या बोजाखाली दबल्या गेलेल्या या दोन्ही तरुणींचा चेंदामेंदा झाला. त्यांच्या मृतदेहाचे तुकडे फावड्याने गोळा करताना अग्निशमन दलाच्या जवानांनाही गहिवरून येत होते. या घटनेने अमरावतीमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. आश्लेषा च्या कुटूंबावर या घटनेमूळे तीव्र आघात झाला आहे.

# कामगार कंत्राटदाराची 49.96 लाखांची फसवणूक

## इंडो फॅब चे चेअरमन आणि सीईओसह चौघांवर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )**- नांदगावपेठ एमआयडीसीतील इंडो फॅब कंपनीतील कामगारांना पगार न मिळाल्याने कामगार कंत्राटदाराने नांदगावपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी कंपनीचे अध्यक्ष संदीप गुप्ता, सीईओ पंकज नरोला, उपाध्यक्ष प्रियांशू बलियान (60) आणि एका महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

गाडगेनगर संकुलातील संतोष भवन गल्ली येथे राहणारे सचिन एकनाथराव महाल्ले (वय 42) हे लेबर कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांनी नांदगावपेठ एमआयडीसीतील शाम इंडो फॅब कंपनीत मजुरीचे कंत्राट घेतले होते. त्यानुसार तो मजुरीचा पुरवठा करत असे. 2014 मध्ये सुरू झालेले काम नोव्हेंबर 2023 पर्यंत सुरू व्यवस्थीत होते. परंतु आरोपींनी डिसेंबर 2023 ते मे 2024 या कालावधीत मजुरीची बिले दिली नाहीत. त्यामुळे त्यांनी कंपनी प्रशासनाकडे अनेकदा दाद मागितली. मात्र याकडे लक्ष दिले नाही. वर्क ऑर्डरनुसार कंपनीला मजूर पुरवठा करण्यात आला होता. तरीही बिले दिली नाहीत. च्आमुशे आपली फसवणूक झाल्याचे सचिन महाल्ले यांच्या निदर्शनास येताच त्यांनी 24 जानेवारी रोजी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. नांदगावपेठ पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला.

### कामगारांनी उपायुक्त कार्यालयासमोर उपोषण

पगार न मिळाल्याने नांदगाव पेठ एमआयडीसी येथील श्याम इंडोफॅबच्या कामगारांनी आपल्या कुटुंबीयांसह कामगार उपायुक्त कार्यालयासमोर जून महिन्यात आमरण उपोषण केले होते. शाम इंडोफॅब कंपनी 2015 पासून सेवा देत असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. यावर्षी जानेवारी ते एप्रिलपर्यंत काम करूनही पगार झाला नाही. आर्थिक विवंचना असल्याचे सांगून सर्वांना घरी पाठवण्यात आले.

# समृध्दीवर भरधाव कारची ट्रकला धडक, एकाचा मृत्यू

## दोन जखमी, समृद्धी महामार्ग घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.25 )** - समृद्धी महामार्गावरील किरजावालाजवळ भरधाव वेगाने ट्रकने कारला धडक दिली. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी पहाटे घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किरजावाला जवळील चॅनल क्रमांक 131-50 वर पुण्याहून नागपूरकडे जाणारी एमएच 14/एलई 3307 या क्रमांकाची कार अचानक समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. या अपघातात कार चालक मंदार नातू (रा. पिंपरी चिचवड, पुणे), नीळकंठ चाबरेकर आणि सुनील धडस (केळगाव) हे जखमी झाले. गंभीर जखमींना अमरावतीच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले असून, जखमींपैकी एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती आहे, मात्र नाव अद्याप समजू शकले नाही. कारमधून प्रवास करणाऱ्या चाबरेकर यांनी सांगितले की, पुण्याहून नागपूरकडे जात असताना महामार्गावर किरजावाला जवळील 131+50 चॅनलवर ट्रक अचानक समोर आल्याने कार ट्रकवर आदळली. ज्यामध्ये हा भीषण अपघात झाला. यामध्ये जखमींना रुग्णवाहिकेतून अमरावती येथे रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस देवगाव केंद्राच्या प्रभारी अधिकारी माया चाटसे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन ठप्प झालेली वाहतूक सुरळीत केली. तळेगावचे ठाणेदार रामेश्वर धोंडगे यांनीही आपल्या पथकासह घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा केला. क्रेनच्या साहाय्याने वाहन हलवून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# एसटीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

## चिचरगव्हाण ते मोरचुंद मार्गादरम्यान घटना

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.25 )**- तालुक्यातील चिंचरगव्हाण ते मोरचुंद रस्त्यावर एसटी बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना 24 जानेवारी रोजी सायंकाळी 7.30 वाजता घडली. याप्रकरणी मृताचे काका गणेश गुलाबराव डंबाळे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी एसटी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लकी डंबाळे (22, रा. फतेपूर, वरुड) असे मृताचे नाव आहे.



लकी डंबाळे हे 24 जानेवारीच्या रात्री कामावरून परतले होते. मित्राला घरी सोडण्यासाठी ते एमपी 31/डीपी 8064 या मोटारसायकलने गेले. तेथून परतत असताना चिंचरगव्हाण ते मोरचुंद मार्गावर एसटी बस क्रमांक एमएच 40/एन 9156 ने लकी यांच्या दुचाकीला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, लकी जागीच ठार झाला. याप्रकरणी काका गणेश गुलाबराव डंबाळे यांच्या फिर्यादीवरून वरुड पोलिसांनी एसटी चालकावर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# प्रजासत्ताक दिनी सहा जणांचा आत्मदहनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - दरवर्षी प्रजासत्ताक दिनी नागरिक आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करत असतात. दरम्यान आपल्या विविध मागण्यांना घेऊन 26 जानेवारी रोजी सहा जणांनी जिल्हा व विभागीय आयुक्त कार्यालय प्रशासनाला आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.

शहरातील नागपुरी गेट येथील एका व्यक्तीने पुणे येथील दिव्यांग कल्याण कार्यालयात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यासह मोर्शी तालुक्यातील शिरजगाव येथील कांचन कुकडे यांनी देखील प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आत्मदहन करण्याचा इशारा दिला. त्यांनी अमरावती जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे निवेदनात नमूद केले होते.

दर्यापूर येथील अभिषेक गावंडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यासह अमरावती विभागातील इतर जिल्ह्यातील नागरिकांनी देखील आपल्या प्रलंबित मागण्यासाठी प्रजासत्ताक दिनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे विभागीय मुख्यालय असलेल्या अमरावती येथील जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे.

# बनावट नाकाशांवर भुखंडांची विक्री

## तलाठयाच्या तक्रारीवरुन 3 जणांवर गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.25 )** - शहरातील सर्व्हे क्रमांक 184 मधील मोकळ्या मैदानाच्या जागेत खोट्या नकाशाच्या आधारे आणि तलाठीवर दबाव आणून 12 भूखंडाचा खोटा सातबारा तयार केल्याचा प्रकार धारणी हद्दीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी धारणीतील तलाठ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सरकारने भूमाफियांविरुद्ध फसवणूक आणि बनावटगिरी आणि इतर कलमांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईने धारणी शहरात सुरू असलेल्या अवैध ले-आऊटमधील भूमाफियांच्या टोळीत खळबळ उडाली आहे.



धारणी शहरातील नेहरू नगरजवळील सर्व्हे क्रमांक 184 च्या ले-आऊटमध्ये मोकळे मैदान व बालक मंदिराची जागा आहे. या जागेबाबत धारणी येथील तलाठी विनोद तायडे यांना नगर रचना अमरावती या नावाने खोटे शिक्के व खोटा नकाशा देऊन वारंवार तगादा लावण्यात आला. हा ले-आऊट अनेक वर्षे जुना असल्याने या नकाशाच्या आधारे पटवारींनी 12 प्लॉटचे सात बारा तयार केले. मात्र तेथील भूखंडधारकांना सातबाराचे बनविण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यावर भूखंडधारकांनी उपविभागीय अधिकारी महसूल यांच्याकडे याबाबत तक्रार केली. ज्यावर या बोगस 12 भूखंडांच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालण्यात आली होती.

धारणीच्या राजवीर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या घोटाळ्याची चौकशी व्हावी, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार विनंती करून अर्ज व तक्रार केली होती. याबाबत धारणीचे तलाठी विनोद तायडे यांनी 23 जानेवारी रोजी धारणी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्याआधारे धारणी पोलिसांनी मो, शोएब मो शब्बीर (धारणी), शे. बिस्मिल्ला शे. गफूर (अमरावती) व मयूर रामेश्वर चव्हाण (अमरावती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या घोटाळ्यात शहरातील अनेक बड्या व्यक्तींची नावेही पुढे आली आहेत.

### आरोपींचा शोध सुरू

धारणीच्या सर्व्हे क्रमांक 184 ले-आऊटमध्ये बोगस नकाशाच्या आधारे 12 भूखंड विकण्याचा प्रयत्न भूमाफियांनी केला होता. याबाबत पटवारी यांच्या तक्रारीवरून हे संपूर्ण प्रकरण लवकरच उघड होणार आहे. सध्या गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

**अशोक जाधव, ठाणेदार, धारणी पोलीस स्टेशन**




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पत्नीची हत्या करुन दिले अपघाताचे रुप

## शवविच्छेदन अहवालात बनाव उलगडा | हत्येचा गुन्हा दाखल करुन पतीला अटक



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, ( दि.25 ) -** मद्यधुंद पतीने पत्नीची बेदम मारहाण करून हत्या केली. त्यानंतर त्याने पत्नीचा अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव रचला होता. मात्र शवविच्छेदन अहवालावरून पत्नीचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे समोर आले. ही घटना 14 जानेवारी रोजी सायंकाळी धारणी ठाण्याच्या हद्दीतील बैरागड येथे घडली होती. या प्रकरणी गुरुवार 23 जानेवारी रोजी आरोपी पतीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला पोलिसांनी अटक केली.

मिठायबाई साबुलाल सावलकर (55 रा. बैरागड) असे मृत महिलेचे तर साबुलाल सानू सावलकर (70 रा. बैरागड) असे आरोपीचे नाव आहे. साबुलाल व मिठायबाई या दोघांनाही दारूचे व्यसन होते. 14 जानेवारी रोजी सायंकाळी दारूच्या नशेत त्यांच्यात वाद झाला. या वादात साबुलालने मिठायबाई यांना बेदम मारहाण केली. त्यात त्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पती साबुलाल याने पत्नी मिठायबाई यांचा दारूच्या नशेत खाली पडून अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव रचला आणि याची माहिती धारणी पोलिसांना दिली होती. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविले होते. या प्रकरणात पोलिसांनी प्रथम आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. दरम्यान, गुरुवारी (दि.23) पोलिसांना शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला. त्यात मिठायबाई यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाला असल्याचे समोर आले. त्या आधारावर पोलिसांनी आरोपी पती साबुलाल सावलकर याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.



## जावयाकडून सासुला मारहाण

**अमरावती** – धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी एका 50 वर्षीय महिलेला जावयाने मारहाण केली. मुलगी गेल्या दोन महिन्यांपासून पतीसोबत भांडण करून तिच्या आईसोबत राहत होती. त्यामुळे 23 जानेवारी रोजी पती राकेश रमेश बामणकर (30, कारा) याने पत्नीच्या माहेरी जाऊन पत्नीला शिवीगाळ करत सासूवर काठीने मारहाण केली. सासूच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी राकेश बामणकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# तब्बल 24 दिवसानंतर नाफेड ने केले त्या शेतकऱ्याचे सोयाबीन खरेदी

## 26 जानेवारीला सोयाबीन पेटविण्याचा दिला होता इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.25 )-** 26 जानेवारीला सोयाबीन पेटविण्याचा इशारा दिल्यानंतर तब्बल 24 दिवसानंतर 26 जानेवारी च्या पुर्वसंध्येला नाफेड ने शेतकऱ्याचे सोयाबीन स्विकारत ट्रॅक्टर, ट्रॉलीचे भाड्याची रक्कम मान्य केली.

मिळालेल्या माहिती नुसार शेतकरी जयदीप रामेश्वरराव गिरनाळे रा.कापुसतळणी (रत्नापूर) यानी कापुसतळणी येथील सुमित्राई फार्मर प्रोड्युसर कंपनी या शासकीय सोयाबीन केंद्रावर दिनांक 2 जानेवारी रोजी सोयाबीन विक्री करीता नेले. येथे ग्रेडरने सोयाबीन खरेदीस नकार देऊन ट्रॅक्टर बाजूला घेण्यास शेतकऱ्यास भाग पाडले. सोयाबीन एफ.ए.क्यू दर्जाचे असल्यामुळे शेतकऱ्याने ट्रॅक्टर बाजूला घेऊन सदर कंपनीचे अध्यक्ष प्रमोद पाटील दाळु यांना फोन करून माहिती दिली. दाळु यांनी शेतकऱ्याला दिलासा न देता शेतकऱ्याचा पाच-सहा दिवस वेळ मारून नेला. त्यामुळे त्रस्त शेतकऱ्याने न्याय मिळण्याच्या दृष्टीने दि.6 जानेवारी रोजी तहसीलदार, जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती; दि.विदर्भ. को. ऑप मार्केटिंग फेडरेशन इत्यादींना तक्रार देऊन आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. परंतु आत्मदहनाच्या दिवसापर्यंत न्याय मिळाला नाही, म्हणून गावातील समाजसेवक तथा प्रहार संघटना उपतालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांना न्याय मिळण्यासाठी विनंती केली.

अरुण शेवाणे यांनी 20 जानेवारीला आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यांच्याकडे निवेदन देऊन 26 जानेवारीला सोयाबीन पेटवून आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला होता. त्यामुळे सदर नाफेड केंद्राच्या चालकाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून आंदोलनाच्या एक दिवस पूर्वीच शेतकऱ्याचे संपूर्ण 53 बॅग सोयाबीन खरेदी करून घेतले आणि 24 दिवसापासून उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली चे भाडे सुद्धा दिले. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा मिळाला.

# शहरात सर्च मोहिम, ग्रामीण पोलीसांना केव्हा जाग येणार?

## अचलपूरमध्ये सर्चिंग करणे गरजेचे



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )–** शहर पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शहरातील विविध आस्थापनेत काम करणाऱ्या बंगाली कामगारांची सर्चिंग हाती घेतली आहे. या मोहिमेला गुरुवारपासून सुरुवात करण्यात आली आहे. शहरातील ज्या व्यावसायिक संकुलात, आस्थापनेत, कारखान्यात बंगाली कामगार काम करीत आहेत, त्यात कुणी बांगलादेशी आहे का? याचा शोध त्यातून घेतला जात आहे. त्यांचे आधार कार्ड खरे की बनावट तेदेखील आधार आयडेंटीफिकेशनद्वारे तपासले जात आहे. असे असताना आकाराने जिल्ह्याचा मोठा व्याप असलेल्या ग्रामीण पोलीस दलामध्ये अशी सर्च मोहिम कधी होणार? असा सवाल जनसामान्यांकडून होत आहे. अचलपूरही रोहिंग्याचे आश्रय बनण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने असे सर्चिंग तातडीने करणे गरजेचे झाले आहे.

शहर क्राइम युनिट दोनचे पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वातील पोलिस पथकाने गुरुवारी रहाटगाव रोडवरील एका बिझनेस पार्कमधील रेडिमेड कापड निर्मितीच्या कारखान्यांत जाऊन तेथील बंगाली कामगारांची कसून तपासणी केली. त्यांचे ठसे आधार कार्डशी जुळतात की कसे, ते देखील प्राधान्याने पाहिले जात आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने महाराष्ट्र सरकारला बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तर दुसरीकडे सीपी नविनचंद्र रेड्डी यांनी सखोल निरिक्षणाअंती शहरात काम करत असलेल्या त्या बंगाली कामगारांची तपासणी मोहिम हाती घेतली आहे.

शहरातील ज्वेलरी व गारमेंटमध्ये काम करणाऱ्यांसह हॉकर्स म्हणून काम करणाऱ्या बंगाली कामगारांची झाडाझडती घेण्यात येत आहे. रोहिंगे मुस्लिमांची भारतात घुसखोरी होण्याची वारंवार भीती व्यक्त केली जात असताना अद्यापही ग्रामीण पोलीसांकडून सर्चिंग सूचना देण्यात आल्या नसल्याचे दिसत आहे.

## 3 गायींना जीवनदान

**अमरावती** – करजगाव-लेहगाव मार्गाने गोवंशांची अवैध वाहतूक करणार्या एका वाहनाला पोलिसांनी 24 जानेवारी रोजी पकडले. माहुली पोलिसांनी एमएच 37/टी 2335 क्रमांकाच्या वाहनाचा पाठलाग केला. त्यावेळी चालकाने लेहगाव रस्त्यावरील एका शेतात वाहन उभे करून तेथून पळ काढला. वाहनात चार गुरे आढळून आली. त्यापैकी एक गोवंशचा मृत्यू झाला होता.

# मानसिक, शारीरिक आरोग्यावर स्माईल मुद्रेसह मेडिटेशन प्रभावी -डॉ.जैन

## एक दिवसीय कार्यशाळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 ) –** आजच्या धावपळीच्या जीवनात आपल्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर स्माईल मुद्रा व मेडिटेशन एक प्रभावी उपचार ठरले आहे, असे प्रतिपादन ओरिजिन स्माईल फाउंडेशनचे अभ्यासक, शोधकर्ता, प्रशिक्षक तथा संस्थापक डॉ.पंकज जैन यांनी काढले.

ते ट्रायओरिजिन स्माईल फाउंडेशन अमरावती शाखा तर्फे आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत बोलत होते. हॉटेल वंदू इंटरनॅशनल येथे नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी पाहुण्यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून शिल्पा देशमुख यांच्या स्वागत गीताने कार्यशाळेची सुरुवात झाली.

डॉ.पंकज जैन पुढे म्हणाले की, स्माईल एक्यूपंक्चर या नवीन संशोधनातून येणारे निष्कर्ष, उपचारांच्या अनेक सोप्या आणि प्रभावी पद्धती विकसित केल्या आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात आपल्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर स्माईल मुद्रा व स्माईल मेडिटेशनने आपण स्वत:वर व इतरांवरही प्रभावी उपचार करू शकतो. अशी माहिती देताना त्यांनी उपस्थितांना उपचाराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाचे आयोजन ट्रायओरिजिन सायन्स स्माईल फाउंडेशन च्या अमरावती शाखेतर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अमृता जाजू व पूजा अंगाईतकर तर आभार प्रदर्शन माया आसावा यांनी केले. कार्यशाळेचे आयोजन ट्राय ओरिजिन व स्माईल फाउंडेशन अमरावती शाखेच्या पदाधिकारी एक्यूपंक्चर थेरपीस्ट स्माईलर वैशाली बोरकर, नीलिमा भटकर, आशिष राठी, विशाल सोमकुवर, पूजा राजदेव, वैशाली शिंगणे, कविता पिंपळे, शितल देशमुख, मालती वावरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संस्थेचा शैक्षणिक गुणवत्तेकडे विशेष भर - गटशिक्षणाधिकारी

## श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालय हंतोडा येथे स्नेहसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.25 )** – श्री.सुखदेवराव अभ्यंकर विद्यालय अंशतः अनुदानित असुन सुध्दा सर्व व्यवस्थापनाने येथे सर्व भौतिक सोयी-सुविधा, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. त्यामूळे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर व अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर यांचे शैक्षणिक कार्य प्रसंशनिय आहे. या विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धाचे व उपक्रमाचे आयोजन करून शैक्षणिक गुणवत्तेकडे विशेष भर दिला जातो. त्यामुळे या विद्यालयातील विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात कमी पडणार नाही असे प्रतिपादन अंजनगाव सुर्जी चे गटशिक्षणाधिकारी भेटसिंग गिरासे यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.

श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. ते कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संस्थेचे सचिव प्राचार्य गजाननराव वानखडे, संचालिका प्रा.शुभांगी अभ्यंकर, प्रमुख अतिथी म्हणून एपीआय सागर भास्कर, शाळा समिती उपाध्यक्ष बाबुराव उंबरकर, माजी उपसभापती महेश खारोडे, प्रमुख उपस्थिती म्हणून हंतोडा सरपंच पूजा गोळे, मलकापूर सरपंच रिना काळे, पद्मा ढेपे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले विविध सुप्तगुण दाखवून नाटक, गीत, सामाजिक संदेश, सामूहिक नृत्य असे विविधांगी कार्यक्रम सादर केले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक केतन खिरकर यांनी केले. सूत्रसंचालन मयुरी लोखंडे तर आभार सारिका वाट यांनी मानले . कार्यक्रमासाठी विपिन हंतोडकर,अनंता मोहोड ,श्रद्धा गोळे, भास्कर चव्हाण, धम्मपाल आठवले, अश्वघोष अभ्यंकर, तसेच विद्यार्थी प्रामुख्याने आदींनी परिश्रम घेतले.

### स्वावलंबी शिक्षण देणे गरजेचे

अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर म्हणाले की शैक्षणिक क्षेत्रात काम करताना खूप अडचणी येतात मी स्वत: माझ्या वडिलांना तीस वर्षापासून काम करताना बघितले आहे. आज आपण पाहत आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थेला सर्व भौतिक सोयी सुविधा , विविध योजनेमार्फत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देते. परंतु खाजगी संस्थेअंतर्गत विद्यालयाल चालवण्यासाठी वेतनत्तर अनुदान तूटपुंजी देते, तरी आम्ही स्वत: खर्च करून संस्था अंतर्गत सर्व शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. आज अमेरिका व युरोपमध्ये लहानपणापासून स्वावलंबी शिक्षणाचे धडे दिले जातात. म्हणून तेथील मुले स्वत:च्या मेहनतीवर जीवन जगतात. या देशात मुलांना स्वावलंबनाचे शिक्षण देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

# माझ्यावर करण्यात आलेले आरोप हे बिनबुडाचे!

## मी आजही सरपंच आहे ध्वजारोहण मीच करणार- प्रतिभा माकोडे



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.25 )-** येवदा ग्रामपंचायत च्या सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी विभागीय आयुक्तांनी त्यांना अपात्र झाले, यामध्ये आपले म्हणणे मांडण्याकरिता त्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्यावरील सर्व आरोप फेटाळले. मी आजही सरपंच असून ध्वजारोहण माझ्या हस्तेच होणार असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. सरपंच माकोडे म्हणाल्या माझ्यावर केलेले आरोप हे बिनबुडाचे आहेत. विनाकारण मला त्रास देण्याकरिता प्रयत्न केला जात आहे. मात्र मी ठामपणे सांगते की, मी आजही सरपंच आहे. उदयाही राहील आणि येत्या 26 जानेवारी चे ध्वजारोहण मीच करणार असल्याचे मत सरपंच प्रतिभा माकोडे यांनी व्यक्त केले. मला विभागीय आयुक्त नव्हे तर नागपूर हायकोर्टाने निकाल लागला त्यापासून तीन आठवडे पर्यंत सरपंच म्हणून कार्यरत राहणार असल्याचे पत्र अधिकृत मला प्राप्त झाले आहे. त्या पत्राच्या आधारेच मी सरपंच कायम असल्याचे त्या म्हणाल्या.

## महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकले

**अमरावती** - वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कांमुजा परिसरातून जाणार्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोराने जबरीने हिसकावून नेले. या घटनेची तक्रार महिलेने 23 जानेवारी रोजी वलगाव पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कंत्राटांमध्ये गौडबंगाल?

## जिल्हा उपनिबंधकांच्या अहवालात संचालक मंडळ दोषी

### स्वच्छता कंत्राटातही अनियमितता



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )-** जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीला नियमांचे उल्लंघन करित मनमानी कंत्राट देणे आणि साफसफाईच्या कंत्राटांमध्ये अनियमितता यासह अनेक प्रकरणांमध्ये दोषी ठरवले आहे. या अहवालात, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने बाजार समितीचे विद्यमान अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि इतर व्यवस्थापकीय सदस्यांविरुद्ध अनेक आक्षेपार्ह टिप्पणी केल्या आहेत. यामध्ये निविदा न घेता मनमानीपणे कंत्राटे देणे, बेकायदेशीर कालावधी वाढवून जास्त दराने स्वच्छता कंत्राटे देणे यासारख्या गंभीर बाबींचा समावेश आहे.

कृषी उत्पन्न बाजारात आर्थिक अनियमितता आणि बेकायदेशीर कंत्राट वाटपाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने तहसील उपनिबंधक सचिन पतंगे आणि लेखापरीक्षक सुशील ठोक यांची चौकशी समिती गठीत केली होती. या समितीने आपला तपास पूर्ण केला आणि जिल्हा उपनिबंधकांना अहवाल सादर केला. अहवालानुसार, मंडी प्रशासनाने प्रशासकीय मंजुरीनुसार 44 लाख रुपयांची कामे आणि तीन विद्युत कामे मंजूर केली होती. या कामांसाठी ई-टेंडरिंग प्रक्रियेद्वारे निविदा काढल्या जाणार होत्या. परंतु बाजार समिती प्रशासनाने कोणत्याही निविदा न काढता बेकायदेशीरपणे आपल्या निकटच्या कंत्राटदारांना कंत्राटे दिली. चौकशीदरम्यान या निविदेत गंभीर त्रुटी आढळून आल्या. बाजार व्यवस्थापनालाही अनेक अनियमिततांमध्ये दोषी धरले. यामध्ये संचालक मंडळाच्या मंजुरी आदेशाला मान्यता न देणे, जाहिरातीतील अनियमितता, निविदा प्रक्रियेतील बेकायदेशीरतेचे आरोप आणि कंत्राटदारांना आगाऊ रक्कम देण्यात आढळलेल्या विविध त्रुटींचा समावेश आहे. जेव्हा स्वराज संस्थेचा स्वच्छता करार संपणार होता, तेव्हा कराराची मुदत संपण्यापूर्वी पूर्वनियोजित तयारी केली गेली नव्हती आणि त्यांना वेळेत मुदतवाढ देण्यात आली आणि 15 टक्के दरवाढीसह करार करण्यात आला. उपनिबंधकांचा हा अहवाल समोर आल्यानंतर बाजार समिती संचालकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### उपनिबंधकांचा अहवाल तथ्यहीन

उपनिबंधकांनी जो अहवाल सादर केला तो तथ्यहीन आहे, आमचे बयाण न नोंदविता हा एकतर्फी अहवाल सादर करण्यात आला आहे. याकरिता आम्ही जिल्हा निबंधकांकडे दाद मागणार आहो.

**हरिष मोरे,**
**सभापती कृ.उ.बा.समिती, अमरावती.**

# आकाशातून पाताळात गेला टोमॅटो?

## गत वर्षी सोन्यासारखा भाव आज कुणी विचारेना



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.25 )** – गेल्या वर्षी देशात टोमॅटोचा तुटवडा होता. त्यामूळे टोमॅटोचे भाव जणू आकाशात गेले होते. अनेक शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचा टोमॅटो विक्री केला. यंदा मात्र गतवर्षीचा टोमॅटोचा भाव आकाशातून थेट पाताळात गेले असल्याचे विचारित नाही. गेल्या सोन्यासारखे भासत असलेल्या टोमॅटोला कुणी विचारत नसल्याचे दिसत आहे.

गेल्या वर्षी कांद्यापेक्षा टोमॅटो भाव खाऊन गेला होता. शेतकर्यांना टोमॅटोचा सोन्यासारखा भाव मिळाला होता. अनेक शेतकर्यांनी लाखो रुपये कमावले होते. पण यंदा टोमॅटोला कवडीमोल भाव मिळाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. दुसरीकडे अनेक जिल्ह्यांतील कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहे. चांगला भाव मिळण्याच्या अपेक्षेने कापसाला घरात ठेवले आहे. हा कापूस आता काळवंडत असल्याने शेतकऱ्यांच्या जीवाला घोर लागला आहे. शेतकऱ्यांनी सरकारला योग्य मदत करण्याची मागणी केली आहे. बाजार समितीत टोमॅटोला कवडीमोल बाजारभाव मिळत असल्याने शेतकर्यांच्या मेहनतीचा चिखल झाला आहे.

### 5 रुपये किलोचा भाव

मात्र यंदा टोमॅटोला 5 ते 10 रुपये प्रतिकिलो बाजार मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. टोमॅटोचे दर अचानक कोसळल्याने उत्पादन खर्च सोडाच वाहतूक खर्चही मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीचा चिखल होत आहे. गेल्या वर्षीप्रमाणेच चांगला बाजारभाव मिळेल या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर टोमॅटोचे पीक घेतले. मात्र आता दर कोसळल्याने त्यांच्यासमोर संकट उभं ठाकलं आहे.

### कापूस घरातच काळवंडला

जालना जिल्ह्यातील अनेक शेतकर्यांनी मकर संक्रांतीनंतर भाव वाढेल या आशेपोटी हजारो क्विंटल कापूस घरातच साठवून ठेवला. मात्र या शेतकर्यांना हमी भावापेक्षा 400 ते 500 रुपये कमी दराने खाजगी व्यापार्यांना हा कापूस विकावा लागत आहे. कमी भावामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. सीसीआय खरेदी केंद्रावरील कापूस खरेदी अतिशय धिम्या गतीने असल्यामुळे शेतकरी खाजगी व्यापार्यांकना कापूस विकत आहे. दरम्यान अनेक दिवसापासून साठवून ठेवलेल्या कापसामुळे अंगाला खाज सुटत आहे. शिवाय कापूस ही काळा पडत असल्याने मिळेल त्या भावात त्याची विक्री करण्यात येत आहे.